# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष–२ ■ अंक–३८ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २४ एप्रिल २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# दिवा-आगासन रस्त्याचे काम पावसाळ्या आधी पूर्ण करा

## नागरिकांची मागणी





**दिवा:**–दिवा आगासन रस्त्याचे काम मागील चार वर्षांपासून सुरू आहे. अद्याप या मुख्य रस्त्याचे काम पूर्णत्वास गेलेले नाही. अनेक ठिकाणी अर्धवट कामामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी वाहनचालक करतात.येत्या पावसाळ्या आधी हा रस्ता पूर्ण होईल का?असा सवाल येथील नागरिक व वाहनचालक विचारत आहेत.

दिवा शहरात दिवा आगासन हा एकमेव प्रमुख रस्ता आहे.या संपूर्ण रस्त्याचे सध्या कॉँक्रीटीकरण चे काम सुरू आहे.मागील चार वर्षांपासून हे काम सुरू असून अतिशय संथ गतीने काम सुरु असल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.पालिका प्रशासनाने पावसाळ्या आधी या रस्त्याचे काम पूर्ण करावे अशी मागणी आता नागरिक करत आहेत.





# शैलेश पाटील यांच्या पुढाकाराने दिव्यातील हजारो नागरिकांनी घेतले देवी एकविरा आईचे दर्शन!



**दिवा:**–सामान्य जनतेला एकाचवेळी आनंदाने मोफत देवदर्शन घडवावे ही अनेक दिवसांची माझी इच्छा एकविरा आईने पूर्ण केली,आज दिव्यातील पाच हजारहून अधिक महिला,पुरुष,लहान मुलं या सर्वांनी आनंदाने आणि भक्ती भावाने एकविरा आईचे दर्शन घेतले अशी भावना एकविरा आई देव दर्शन सोहळ्याचे आयोजक शैलेश पाटील यांनी व्यक्त केली.

रविवारी दिव्यातील हजारो नागरिकांनी एकाच वेळी आई एकविरा देवीचे दर्शन घेतले. माजी नगरसेवक व शिवसेना उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांनी हा उपक्रम आयोजित केला होता.

दिवा शहरातील सर्व सामान्य नागरिकांना मोफत देवदर्शन सामूहिक पध्दतीने घेता यावे,नागरिकांमध्ये बंधुभाव वाढवा या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांमार्फत सांगण्यात आले. दिव्यातून सर्व देवी भक्तांना आई एकविरा देवीच्या दर्शनासाठी १०८ विशेष बससेसची व्यवस्था करण्यात आली. हा संपूर्ण देवदर्शन सोहळा नागरिकांना मोफत होता.शैलेश पाटील आयोजित देवी एकविरा आई दर्शन सोहळ्यात दिव्यातील सुमारे पाच हजार हुन अधिक नागरिक सहभागी झाले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात दिव्यातून देवदर्शन साठी सामूहिक रित्या नागरिक जाण्याचा हा पहिलाच उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### राजकारणा पलीकडे समाजसेवेचे व्रत म्हणून देवदर्शन सोहळ्याचे आयोजन!

माजी नगरसेवक शैलेश पाटील हे विविध उपक्रम राबवून दिवा शहरातील जनतेला दिलासा देण्याचे काम करत असतात.राजकारणा पलीकडे समाजसेवेचे व्रत जपण्याचे काम शैलेश पाटील करत असतात. कोरोना काळात मोफत लसीकरण चा उपक्रम देखील शैलेश पाटील यांनी दिव्यात पहिल्यांदा आयोजित केला होता. सामान्य दिवेकरांच्या जीवनात आनंद मिळावा यासाठी शहरातील हजारो नागरिकांना एकाच वेळी देवी एकविरा आई दर्शन घडविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, २४ एप्रिल २०२३


# कचरा वर्गीकरणाबाबत आयुक्तांनी साधला सिंघानिया शाळेच्या विद्यार्थ्यांसोबत संवाद

**ठाणे महापालिका व आर. निसर्ग फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती मोहिम**

**ठाणे :** शहर सौंदर्यीकरण व स्वच्छतेसाठी राज्याच्या नगरविकास विभागाच्या माध्यमातून ठाणे महानगरपालिकेस दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. मागील काही महिन्यांपासून अधिक गतीमानतेने काम व्हावे या दृष्टीने मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे मोहिमेतंर्गत शहरामध्ये युद्धपातळीवर काम सुरू आहे. आज निश्चितच ठाणे शहर सुंदर व स्वच्छ शहर दृष्टीस पडत आहे. ठाणे शहर स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपाययोजना राबवित आहे. ठाणे महानगरपालिका व ठाण्यातील आर. निसर्ग फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने कचरा वर्गीकरणाबाबत शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून आगळी - वेगळी मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत सुलोचनादेवी सिंघानिया या शाळेचे विद्यार्थी उन्हाळ्याच्या सुट्टीत नागरिकांमध्ये जनजागृती करणार असून प्रत्यक्ष कामास त्यांनी सुरूवात देखील केलेली आहे. या संदर्भात शुक्रवारी आयुक्त अभिजीत बांगर यांनी आर निसर्ग स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी व श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया शाळेतील विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला.




गुरूवारी मुंबई, नरीमन पॉईट येथे नगरविकास दिनानिमित्त झालेल्या पुरस्कार वितरण सोहळयात ठाणे महानगरपालिका व आर. निसर्ग फाऊंडेशनच्या माध्यमातून श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया शाळेच्या विद्यार्थ्यांनी कचऱ्याच्या वर्गीकरणाबाबत सादरीकरण केले. या सादरीकरणातून त्यांनी महात्मा गांधीजीच्या तीन माकडांनी दिलेल्या 'बुरा मत सुनो, बुरा मत बोलो, बुरा ना देखो' या संदेशाचा आधार घेत स्वच्छतेबाबतही 'सुका कचरा, ओला कचरा, घरगुती घातक कचरा' असे वर्गीकरण करा असा संदेश देत असतानाच आपल्या घराप्रमाणे आपला परिसर व शहरही स्वच्छ ठेवले पाहिजे अशी जनजागृतीही त्यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून केली. आज या विद्यार्थ्यांनी आयुक्त बांगर यांची भेट घेवून या मोहिमेबद्दल अधिक माहिती देत संवाद साधला. यावेळी ओला कचऱ्यासाठी हिरव्या रंगाचा, सुका कचऱ्यासाठी निळ्या रंगाचा, व घरगुती घातक कचऱ्यासाठी काळा रंगाचा डबा वापरावा हे विद्यार्थ्यांनी विषद केले. यावेळी आयुक्त बांगर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया हायस्कूलचे ५०० शालेय विद्यार्थी हे उन्हाळयाच्या सुट्टीत घरोघरी जावून नागरिकांमध्ये कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती करणार आहेत. विद्यार्थ्यांच्या या जनजागृतीची सुरूवात निश्चितच त्यांच्या स्वत:च्या घरापासून होण्यास मदत होईलच त्यामुळे समाजात देखील सकारात्मक बदल नक्कीच घडेल व युवा पिढीच्या माध्यमातून होणारा बदल हा स्वच्छ वातावरण, निरोगी जीवन व पर्यावरणाचे रक्षण करण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास यावेळी आर. निसर्ग फाऊंडेने व्यक्त केला.

आगामी काळात या मोहिमेमध्ये ठाण्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग मिळेल या दृष्टीने प्रयत्न करावेत, जेणेकरुन सदर मोहिम कमी कालावधीमध्ये जास्तीत जास्त नागरिकांपर्यत पोहचण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांनी या मोहिमेत हिरीरीने सहभाग घेतल्याबद्दल त्यांचे व आर.निसर्ग फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करुन आभार व्यक्त केले तर यासाठी महापालिकेच्या माध्यमातून सहकार्य करण्यात येईल असेही आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## मॉडेलिंग करणाऱ्या मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास लावणाऱ्या मॉडेल महिला दलाल जेरबंद

**ठाणे:** हिंदी सिरीयल, वेबसिरीज, मॉडेलिंगमध्ये काम करणाऱ्या कलाकार मुलींना वेश्याव्यवसाय ओढणाऱ्या एक मॉडेल महिला दलालला ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाने जेरबंद केले. तसेच तिच्या तावडीतून तीन पीडित मॉडेल महिलांची सुटका करण्यात यश आले असून ही कारवाई राबोडीत करण्यात आले.

ठाणे शहर परिसरात तसेच वेगवेगळ्या ठिकाणी काही महिन्यांपासून हिंदी सिरीयल, वेबसिरीज, मॉडेलिंग काम करणाऱ्या कलाकार मुलींना ग्राहकांसोबत वेश्यागमनासाठी ठाणे, मुंबई परिसरातील ३ स्टार आणि ५ स्टार हॉटेलमध्ये पाठवत.अशाप्रकारे काही मॉडेल दलाल महिला ग्राहकांना मुली पुरवित असल्याबाबत ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस पथकास मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या पथकाने राबोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका हॉटेलवर छापा मारुन एक मॉडेल महिला दलालला ताब्यात घेऊन,तीन मॉडेल महिलांची सुटका केली. त्या महिला दलालला विरोधात राबोडी पोलीस ठाण्यात भादवि कलम ३७० (२) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५९ चे कलम ३, ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करून तिला अटक केली.

## भिवंडीत ३ टन प्रतिबंधित मांगुर मत्स्यसाठा नष्ट

### मत्स्य विभागाची कारवाई, तिघांवर गुन्हा दाखल

**ठाणे :** भिवंडीतील कुंभारशीव या ठिकाणी वन विभागाच्या जागेत अनधिकृतपणे प्रतिबंधित मांगुर मत्स्यव्यवसाय केला जात असल्याची बाब समोर आली आहे. याप्रकरणी वनविभागाने कारवाई करत तीन टन मांगुर माशांचा साठा शास्त्रोयुक्त पद्धतीने नष्ट केला. तर याप्रकरणी तिघांविरोधात पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मत्स्यव्यवसाय विभागाने केली.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कुंभारशीव याठिकाणी वन विभागाच्या जागेवर मांगुर माशाचे संवर्धन करीत असल्याची बाब ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या निर्दशनास आल्यावर त्यांनी याची माहिती मत्स्यव्यवसाय विभागास दिली. त्यानुसार त्या विभागाने भिवंडीतील कुंभारशिव या ठिकाणी धडक टाकली. यावेळी मांगुर मत्स्यसंवर्धन हे वनविभाग्याच्या जागेवर करीत असल्याचे दिसून आले. तसेच पश्चिम बंगाल येथे राहणारे सलाउद्दीन मंडल यांनी आदिवासींकडून भाडेतत्वावर ही जमीन घेवून अनधिकृतपणे मत्स्य संवर्धन करीत असल्याचे आढळून आले. त्यानुसार पडघा मंडळ अधिकारी यांच्यासह पोलीस बंदोबस्तात मत्स्यविभागाने कारवाई केली. यावेळी २८ तलावांपैकी ३ तलावांमध्ये अनधिकृतपणे आढळून आलेला ३ टन प्रतिबंधित मांगुर माशांचा साठा शास्त्रोयुक्त पद्धतीने जेसीबीच्या साहित्याने नष्ट करण्यात आला. तसेच तलावावर उपस्थित असलेल्या तीन कामगारांवर पडघा पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय विभागाने दिली.

राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशानुसार तलावात मांगुर माशांचे संवर्धन व विक्री करण्यास बंदी आहे. परंतु,भिवंडी तालुक्यातील कुंभारशिव येथे वन विभागाच्या जागेवर अनधिकृतपणे मांगुर माशाचे संवर्धन केल्याचे आढळून आल्याने ३ टन साठा नष्ट करण्यात आला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**



## कोकण मर्कंटाईल बँकेच्या अध्यक्षपदी सलग दुसर्यांदा नजीब मुल्ला बिनविरोध

**ठाणे :**कोकण मर्कंटाईल मल्टी स्टेट को. ऑपरेटिव्ह बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत विद्यमान चेअरमन नजीब मुल्ला यांच्या कुशल नेतृत्वावर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वास व्यक्त करीत सलग दुसर्यांदा पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध केली आहे.

महाराष्ट्रासह गोवा ,आंध्र प्रदेश आणि गुजरात या राज्यात विस्तारलेल्या सुमारे ५४ हजार सभासद असलेल्या कोकण बँकेच्या ५३ वर्षाच्या कालखंडात निवडणुकीची प्रथा मोडीत काढून सलग दोन वेळा बँकेची निवडणूक बिनविरोध पार पडण्याचा करिष्मा विद्यमान चेअरमन नजीब मुल्ला आणि व्हाईस चेअरमन आसिफ दादन यांनी केला आहे.

सुमारे दोन हजार कोटी ची आर्थिक उलाढाल असलेल्या कोकण बँकेला विद्यमान चेअरमन नजीब मुल्ला यांनी गेली पंधरा वर्षात बँकेला प्रगतीपथावर नेऊन ठेवले आहे. युवा संचालकांना एकत्र घेऊन बँकेची घोडदौड पाहता सभासदांनी सलग दोन वेळा विश्वास व्यक्त करून निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पाडली आहे.

समाजातील सर्वच घटकांना आणि सभासदांना विश्वासात घेऊन सोबत सन २०२३- २८ या कालावधी करिता नव्याने निवडून आलेले संचालक मंडळ पुढील प्रमाणे - नजीब मुल्ला ,आसिफ दादन, डॉ. शाहिद बरमारे,असगर डबीर,दिलीप मुजावर,बशीर मुर्तुझा, अल्ताफ काझी, ड. तसनीम काझी, फरीदा काझी, ड. मकबूल सुर्वे, डॉ. साजिद अधिकारी, फरहान वलाले ,मिलिंद कडलक, मोहम्मद नावेद रोगे, रिझर्व बँकेचे निवृत्त जनरल मॅनेजर अब्दुल रशीद शेख, समीर मुल्ला हे संचालक बिनविरोध निवडून आले आहेत.


कोकण बँकेची निवडणूक बिनविरोध होताच मुंबई येथे सभासदांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत एकच जल्लोष केला आणि नवनिर्वाचित संचालकांवर अभिनंदनचा वर्षाव केला.

# दिवा मनसेमुळे नागरिकांना दिलासा



*दिवा:- श्री साई लीला अपार्टमेंट, सद्गुरू वाडी, प्रशांत नगर, अद्वैत बिल्डिंग परिसरात ड्रेनेज चे पाणी रस्त्यावर जमा होत होते. हे पाणी ज्या ठिकाणाहून मुख्य नाल्याला जाऊन मिळते त्याच ठिकाणी डेब्रिज आणि कचरा टाकून हा प्रवाह बुजवण्यात आला होता. हा प्रवाह पुन्हा सुरळीत करण्यासाठी विनोददादा पाटील यांच्या सूचनेनुसार महापालिकेच्या घनकचरा विभागाचे अधिकारी परदेशी यांच्याशी चर्चा करून मनसेने जेसीबी उपलब्ध करून घेतला. आणि शनिवारी सकाळी ८.०० वाजल्यापासून डेब्रिज आणि कचरा हटवण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. यावेळी मनसेचे प्रशांत गावडे, विभाग सचिव परेश पाटील हेही उपस्थित होते. सदर कामासाठी महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहकार्य केल्याबद्दल मनसेने आभार मानले आहेत.*



**दिवा शहरात आयोजित विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना सामाजिक कार्यकर्त्या सौ.अर्चना निलेश पाटील यांनी उपस्थिति दर्शविली त्यावेळेचे छायाचित्रे. (छाया:-एस. सुदेश)**

# शिवसेना दिवा शहराने घडवले हजारो महिलांना एकविरा देवीचं दर्शन

## शहरप्रमुख, मा.उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली केलं गेलं दर्शन सोहळ्याचं आयोजन








दिवा शहरात शिवसेनेच्या वतीने शुक्रवार दिनांक २१ एप्रिल रोजी एकविरा देवीचं दर्शन सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. शिवसेना शहरप्रमुख तथा मा.उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या वतीने काढण्यात आलेल्या या दर्शन सोहळ्यात दिवा शहरातील हजारो महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. सकाळी आठ वाजता तब्बल ५० बस व अनेक खाजगी गाड्यांमधून निघालेल्या सर्व महिला अकराच्या सुमारास कार्ला येथे पोहचल्या. खास महिलांसाठी उभारल्या गेलेल्या भल्या मोठ्या मंडपात क्षणभर विश्रांती घेतल्यानंतर सर्व महिलांनी देवीच्या गडावर जाऊन एकविरा देवीचं दर्शन घेतले. शिवसेना शहर प्रमुख श्री.रमाकांत मढवी, नगरसेविका सौ.दर्शना चरणदास म्हात्रे, शहर अधिकारी युवती सेना कु. साक्षी मढवी, यांनी स्वतः सर्व महिलांसोबत गडावर जाऊन एकविरा आईचं दर्शन घेतल्यामुळे महिलांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झालेला बघायला मिळाला. दर्शन झाल्यानंतर महिलांची उत्तम जेवणाची सोय करण्यात आली व त्यांनंतर महिलांच्या मनोरंजनासाठी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता सदर कार्यक्रमात उपस्थित महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमात महिलांना सोन्याची नथ, पैठणी व इतर अनेक बक्षिसं जिंकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपशहर प्रमुख गणेश मुंडे, नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे, सुनीता मुंडे, नगरसेवकदिपक जाधव, शहर अधिकारी युवती सेना कु. साक्षी मढवी, विभाग प्रमुख चरणदास म्हात्रे, शशिकांत पाटील, विनोद मढवी, उपविभाग प्रमुख सचिन चौबे, जगदीश भंडारी, राजेश पाटील, सदाशिव पाटील, शरद पाटील, तुकाराम मुंडे, शाखाप्रमुख निलेश म्हात्रे, गणेश गायकवाड, संतोष देसाई, राजेश पाटील, जयदास शेलार, महेश पाटील, मनोज खंडागळे, भूषण पाटील, शिवदास पाटील, सुरेश पाटील, प्रशांत कदम, धीरज देशमुख, राकेश म्हात्रे, केशव पाटील, सोपान म्हात्रे, रुपेश मढवी, रंदीप मढवी, संजय म्हात्रे, संजय भगत, विठ्ठल घेवडे, शंकर म्हात्रे, अरुण म्हात्रे, विजय भोईर आदी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली. यावेळी नगरसेवक अमर पाटील, नगरसेविका दिपाली भगत, उपशहरप्रमुख अँड. आदेश भगत, विभाग प्रमुख उमेश भगत, गुरुनाथ पाटील, निलेश पाटील, शैलेश भगत, अर्चना पाटील, अँड. सुप्रिया भगत, भाग्यश्री पाटील आदी पदाधिकारी देखील उपस्थित होते. शिवसेना दिवा शहराच्यामुळे आई एकविरा देवीचं दर्शन झाल्यामुळे अनेक महिलांनी रमाकांत मढवी व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार व्यक्त केलं.








# शहरातील कामे १ जूनपूर्वी पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**ठाणे: ठाणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी पाहता त्यावर उपाययोजना करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी रात्री पोलीस, परिवहन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली. ठाणे शहरात सुरू असलेली विकासकामे १ जूनपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश देतानाच खड्डेमुक्त आणि वाहतूक कोंडीमुक्त रस्ते करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी आयोजित बैठकीला ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त जयजित सिंह, महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर, रस्ते विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, अतिरिक्त पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. पंजाबराव उगले, वाहतूक विभागाचे उपायुक्त विनय राठोड आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील सर्व रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या. हा रस्ता कुणाच्या मालकीचा आहे याचा विचार न करता



## रस्ते खड्डेमुक्त, वाहतूक कोंडी मुक्त करण्याच्या सूचना

त्यावरील खड्डे तत्काळ बुजवा. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात सध्या अनेक ठिकाणी विकासकामे सुरू असून त्याचा मोठा ताण ठाणे शहरावर पडला आहे, परिणामी जागोजागी वाहतूक कोंडी होत असून त्यामुळे बहुतांश कामे ही १ जूनपूर्वी पूर्ण करावीत असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तसेच पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी करावयाच्या उपाययोजना

## निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे निर्देश

आतापासूनच हाती घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

भिवंडी–कशेळी मार्गावरील एमएमआरडीएच्या माध्यमातून सुरू असलेले काम ६० टक्के पूर्ण झाले असून पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करावे असे निर्देश यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. भिवंडी शहरातील जे रस्ते खराब आहेत त्यांची डागडुजी तात्काळ एमएमआरडीएच्या माध्यमातून करून घ्यावी. साकेत–खारेगाव पुलावर होणारी कोंडी फोडण्यासाठी एमएसआरडीसीच्या माध्यमातून मुंबई– नाशिक महामार्गावर सुरू असलेल्या रस्त्याचे कामदेखील पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावेत गरज वाटल्यास रात्रंदिवस काम करून अतिरिक्त मनुष्यबळ वापरण्याच्या सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिल्या.

ठाणे–नाशिक महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीदरम्यान अनेकदा काल्हेर ते आर. सी.पाटील दरम्यान मुंबई महानगर पालिकेच्या पाईपलाईन रोडचा वापर केला जातो ह्या पाईपलाईन रोडची डागडुजी ताबडतोब करून तो सुस्थितीत आणण्याच्या सूचना यावेळी मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबालसिंह चहल यांना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

मुंब्रा बाह्यवळण रस्त्याचे काम सुरू असल्याने सध्या वाहतूक अन्य मार्गाने वळवण्यात आलेली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी वाढली आहे. मुंब्रा बाह्यवळण रस्त्याच्या कामाला गती देतानाच त्याच्या दुभाजकादरम्यान झाडे लावण्याचे तसेच त्यांच्या दोन्ही बाजू आधुनिक पद्धतीने बांबूच्या सहाय्याने सुशोभित करण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.



## एनएमएमटी वाहनचालक नंदकुमार लावंड हिरोज ऑन द रोड राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी

**नवी मुंबई** – आपल्या २७ वर्षाच्या बसचालक सेवेत विना अपघात सेवा देणारे नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे बस चालक नंदकुमार लावंड यांना नुकताच राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांच्या शुभहस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

कॉन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री यांच्या हस्ते देशातील राज्य रस्ते परिवहन महामंडळाच्या शहरांतर्गत बससेवा चालकांना हिरोज ऑन द रोड शिर्षकांतर्गत रस्ते सुरक्षा पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका पहिवहन उपक्रमातील वाहनचालक श्री नंदकुमार लावंड (चा.क्र.०९६१३२) यांना त्यांच्या २७ वर्षांच्या विना अपघात सेवेकरिता देशातील ४२ चालकांसह सन्मानीत करण्यात आले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील चालकास राष्ट्रीय सन्मान प्राप्त झाल्याबद्दल महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर तसेच परिवहन व्यवस्थापक श्री. योगेश कडुसकर आणि परिवहन उपक्रमातील अधिकारी, कर्मचारी तसेच नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारीवृंद यांच्यामार्फत अभिनदन करण्यात येत आहे.

# ठाण्यातील सर्व इमारतींचे फायर ऑडिट तातडीने करा

## खासदारांची ठामपा आयुक्तांकडे मागणी

ठाणे: मंगळवारी रात्री आठच्या सुमारास घोडबंदर मार्गावरील सिनेवंडर मॉल च्या शेजारी असलेली ओरियन बिझनेस पार्क या इमारतीला लागलेली भीषण आग विझवण्यासाठी ठाणे महापालिकेचे अग्निशमन दल अपयशी ठरल्याने खासदार राजन विचारे यांनी गुरुवारी ठाणे महापालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांना पत्राद्वारे महापालिका हद्दीतील सर्व इमारतींचे फायर ऑडिट व मॉक ड्रिल करण्याची मागणी केली आहे.

या घटने वेळी खासदार विचारे त्या ठिकाणी स्वतः उपस्थित होते. महापालिकेचे अग्निशमक दल प्रयत्न करीत होते. परंतु आग लागलेल्या ठिकाणी पोहोचण्यासाठी अपुरारस्ता असल्यामुळे आग विझवण्यात त्यांना यश येत नव्हते. अग्निशमन दलाच्या ब्रँट्रो गाड्या असल्याने या गाड्यांसाठी एकावेळी तीन पाण्याच्या टँकरची आवश्यकता असते. परंतु अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे ते शक्य होत नव्हते. ठाणे शहर हे तलावांचे शहर असताना अशावेळी तलावाचे पाणी कसे वापरात आणता येईल हेही अधिकाऱ्यांना सुचले नाही. ठाणे शहर हे स्मार्ट सिटीच्या दिशेने जात असताना ठाणे महानगरपालिकेच्या अपुऱ्या यंत्रसामुग्री व नियोजन अभावी तसेच इमारतींना परवाना देतेवेळी अग्निशामक दलाने फायर ऑडिट न करता शहर विकास विभाग परवाना कसा देऊ शकते यावर खासदार राजन विचारे यांनी संशय व्यक्त केला आहे. या आग विझविण्यासाठी अखेर ठाणे महानगरपालिकसोबत, मुंबई, नवी मुंबई, कल्याण, डोंबिवली व मीरा–भाईंदर या पाच महापालिकेची व एअर फोर्सची मदत घ्यावी लागली.

या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर लागलेली छोटीसी आग विजविण्यास ११ तास लागले त्यामुळे हा वणवा पेटतच गेला. व पाचव्या आणि चौथ्या मजल्यावर २३ कार्यालय, तीन कार व २३ दुचाकी व इतर आगीमध्ये जाळून खाक होऊन लाखोंचे नुकसान झाले आहे. दुर्दैवाने मनुष्यहानी झाली नाही. पोलिसांच्या दक्षतेमुळे २०० ते २५० नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात त्यांना यश आले. खा.विचारे यांनी दिलेल्या पत्रात अवघ्या एका आगीमध्ये अग्निशमन दलाची तारांबळ उडाली असल्याने महापालिका क्षेत्रात भीषण आग लागल्यास काय परिस्थिती निर्माण होऊ शकते हा प्रश्न आता नागरिकांना सतावत आहे. असे पत्रामध्ये म्हंटले आहे. वागळे इस्टेट भागात सर्वात जुनी औद्योगिक वसाहत आहे. या भागात आयटी पार्क आहेत. हजारो कामगार या ठिकाणी कामानिमित्ताने येत असतात. व्यवसायिकांची कोट्यवधीची उलाढाल येथे होत असते. अशाप्रकारची आग या भागात लागल्यास आपण किती तत्पर आहात? घोडबंदर रस्ता हा तुलनेने अरुंद आहे.

या ठिकाणी आग विझविण्यास नाकी नऊ आले. तर अशा गर्दीच्या, लोकवस्तीच्या ठिकाणी आग कशी आटोक्यात आणाल? असा सवाल खासदार राजन विचारे यांनी महापालिका प्रशासनाला केला. तसेच शहरात टोलेजंगी इमारती बांधण्यास परवानग्या दिल्या जात आहेत. २०/२५ मजली इमारती शहरात बांधल्या जात आहेत. या इमारतींना अग्निशमन दलाच्या परवानग्या असतात का? इमारती उभ्या राहत आहेत परंतु या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या संरक्षणाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असलेली रचना याचे पालन व्यवस्थित रित्या न झाल्याने या घटना वारंवार ठाणे शहरात घडत आहेत.

# बारसू रिफायनरी प्रकल्पासाठी पुन्हा सर्व्हे

**रत्नागिरी :** रिफायनरी प्रकल्प नाणारमध्ये होणार होता. याला ग्रामस्थांची तीव्र विरोध झाला. त्यानंतर महाविकास आघाडीने हा प्रकल्प तेथून हलविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बारसू, सोलगावमध्ये रिफायनरी असा प्रस्ताव पुढे आला. त्यानुसार बारसूची निवड करण्यात आली.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या बारसू रिफायनरीसाठी सोमवारपासून पुन्हा सर्व्हे सुरु होण्याची शक्यता आहे. रखडलेला सर्व्हे पुन्हा सुरु होणार आहे, अशी सूत्रांची माहिती आहे. जिल्हा प्रशासन त्यासाठी सज्ज झाले आहे. विरोध पाहता अंदाजे १५०० पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. राज्य सरकार सर्व्हे करण्यासाठी आग्रही असल्याची माहिती आहे. मात्र पोलीस आणि जिल्हा प्रशासन माहिती देण्यास टाळाटाळ करत आहे.

हा प्रकल्प व्हावा यासाठी पालकमंत्री आणि उद्योगमंत्री उदय सामंत प्रयत्नशील आहेत. त्यांनी याआधी प्रकल्पाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोणाचे काही प्रश्न असतील ते प्राधान्याने सोडविण्यात येतील. तसेच विरोध करणाऱ्यांना समजवण्यात येईल. ग्रामस्थांशी चर्चा करण्यासाठी आपण पुढाकार घेऊ, असे स्पष्ट केले होते. आता बारसू रिफायनरी प्रकल्प मार्गी लागावा, यासाठी पुन्हा सर्व्हे सुरु करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. दरम्यान, होत असलेला विरोध लक्षात घेता बारसू परिसरात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.




# किल्ले रायगडावर २ जून रोजी शिवराज्याभिषेक सोहळा

## दिनोत्सव समितीतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन



**रत्नागिरी :** रायगडावर तिथीनुसार होणाऱ्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सुनील पवार दिनोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी तिथीनुसार २ जून २०२३ या दिवशी होणारा हा सोहळा संस्मरणीय व्हावा, यासाठी समितीमार्फत किल्ले रायगडावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती रायगडचे अध्यक्ष सुनील पवार यांनी दिली.

पवार म्हणाले, श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती ही संस्था दुर्गराज रायगड येथे प्रत्येक वर्षी हिंदू तिथीनुसार स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक दिनोत्सव सोहळ्याचे आयोजन करत असते. गेली अठ्ठावीस वर्षे महाराष्ट्रातील शिवप्रेमी, मावळे एकत्र येऊन हा सोहळा साजरा करतात. यंदा या उत्सवाचे २९ वे वर्ष आहे. यंदा ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्याचे भाग्य समितीला लाभलेले आहे. यावर्षी तिथीनुसार २ जून २०२३ या दिवशी होणारा हा सोहळा संस्मरणीय व्हावा, यासाठी समितीमार्फत किल्ले रायगडावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाला महाराष्ट्र शासनाचेही सहकार्य समितीला लाभणार आहे. ३५० वर्षापूर्वी छत्रपति शिवाजी महाराजांचा राजाभिषेक जसा झाला तसाच राजाभिषेक सोहळा यावर्षी महाराष्ट्रातील जनतेला अनुभवायला मिळणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या राज्याभिषेक प्रसंगी शिवराज्याभिषेक शक सुरू केले होते. त्यामुळे हा दिवस आपल्यासाठी पाडव्याप्रमाणे असून, त्या दिवशी प्रत्येकाने आपल्या घरात गुढी उभारून हा दिवस शिवपाडवा म्हणून साजरा करावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष सुनील पवार यांनी केले.

यावर्षी सोहळ्याला एक लाख हून अधिक शिवप्रेमी किल्ले रायगडवर येतील. हिंदुस्थानातील ३५० नद्यांचे पाणी एकत्र करून त्यादिवशी शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर जलाभिषेक करण्यात येणार आहे. गड प्रदक्षिणा, गड पूजन, गडावरील देवतांचे पूजन, शस्त्र पूजन, मर्दानी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, पालखीची मिरवणूक या सर्व गोष्टी परंपरेने आलेल्या वेशभूषा साजरे केले जाणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात तुलादान केले जात होते. तसा तुलादानविधी समितीच्या वतीने रायगडावर साजरा केला जातो. एका बाजूला शिवाजी महाराजाची मूर्ती, तर दुसऱ्या बाजूला शिवप्रेमी जी वस्तू दान करतात त्याची तुला येथे केली जाते.

# मुंबई गोवा महामार्ग वाहतुकीबाबत मोठा निर्णय



**रत्नागिरी :** कोकणात तसेच गोव्यात जाणाऱ्यांना प्रवाशांना आता पंधरा दिवस थोडीशी कसरत करावी लागणार आहे. परशुराम घाटातील वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ही वाहतूक दुसऱ्या मार्गे वळविण्यात येणार आहे.

मुंबई गोवा महमार्गावरुन प्रवास करणाऱ्यांसाठी मोठी बातमी आहे. या मार्गाच्या वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. चिपळूण जवळील परशुराम घाटात काम करण्यात येणार आहे. त्यामुळे हा घाट वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गावरुन प्रवास करणाऱ्यांनी माहिती घेऊन प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कोकणात तसेच गोव्यात जाणाऱ्यांना प्रवाशांना आता पंधरा दिवस थोडीशी कसरत करावी लागणार आहे. परशुराम घाटातील वाहतूक २५ एप्रिल २०२३ ते १० मे या कालावधीत दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ही वाहतूक चिरणी आंबडस मार्गे वळविण्यात येणार आहे. याबाबतचा आदेश रत्नागिरीचे जिल्हाधिकारी देवेंद्र सिंह यांनी जारी केला आहे.

## शहरात दुष्काळ पडण्याआधी धरणाचा वापर करण्यात यावा

# दिघ्यातील धरणाच्या हस्तातरणाचा प्रश्न मार्गी लावा

### मनसेचे सचिव प्रदीप सावर्डेकर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**ठाणे: कळवा आणि ऐरोली शहराच्या मध्यस्थानी असणाऱ्या दिघा येथील रेल्वेच्या धरणाकडे कोणाचे लक्ष गेलेले नाही. ब्रिटिशांनी दिघा येथे बांधलेले धरण पूर्ण क्षमतेने भरले असले तरी या पाण्याचा वापरच केला जात नाही.**

हे रेल्वेचे धरण महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी या आधी करण्यात आली होती, परंतु अद्याप त्यावर ठोस निर्णय झालेला नसल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तर शहरात दुष्काळ पडण्याआधी लाल फितीत अडकेलेल्या या धरणाच्या वापरास सुरूवात करावी अशी मागणी ठाणे मनसेचे सचिव प्रदीप सावर्डेकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

ठाणे जिल्ह्यात अनेक ठिकाणीं पाणी पुरवठा सुरळीत सुरु नाही. तसेच काही भागात पाण्याची टंचाई जाणवत आहे. तर नवी मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली या भागात पाण्याचे नियोजन बारगळले आहे. असे असताना नवी मुंबई सारख्या शहरत या धरणाचा फायदा मात्र होताना दिसत नाही. अनेक लोकप्रतिनिधीही त्यासाठी पुढाकार घेताना दिसत नाहीत. आता या धरणाकडे पावसाळी पिकनिक स्पॉट म्हणून पाहिले जात आहे. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना राबवण्यात न आल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. या धरणाबाबत योग्य तो निर्णय लवकरात लवकर घेण्याची मागणी सावर्डेकर यांनी केली आहे.

देशातील पहिली रेल्वे मुंबई ते ठाणे दरम्यान १८५३मध्ये सुरू करण्यात आली. तेव्हाच्या रेल्वे इंजिनसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता होती. वर्षभर भरपूर पाणी मिळावे, यासाठी ब्रिटिशांनी नवी मुंबईमधील दिघा इलठाणपाडा येथे १८.१० एकर जमिनीवर १८५ मीटर लांबीचे व १४.९५ मीटर उंचीचे धरण बांधले. नैसर्गिक जलस्रोत असल्यामुळे या धरणातील पाणी मे महिन्यातही आटत नाही. पण स्वातंत्र्यानंतर या धरणातील जलसाठ्याचा काहीच उपयोग करण्यात आलेला नाही. धरणांमधील पाणीवाटप व वापरावरून मोठ्या प्रमाणात वाद सुरू असतात. पण पाण्याचा वापर न होणारे दिघा हे एकमेव धरण आहे. मान्सून सुरू होताच राज्यातील सर्वात पहिले हेच धरण भरले. या धरणाच्या संरक्षण कठड्यावरून पाणी वाहत असते. मात्र फक्त हे दिख्खाव्याचे धरण असून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लवकरात लवकर या धरणा संदर्भात योग्य ते निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# दिघा रेल्वे स्थानक लवकर सुरू करा

### खासदारांची रेल्वे प्रशासनाकडे मागणी



**ठाणे:** MUTP-3 च्या ऐरोली कळवा एलिवेटेड या प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील दिघा रेल्वे स्थानकाचे काम पूर्ण झाले असून हा दिघा रेल्वे स्थानक प्रवाशांसाठी सुरू करा अशी मागणी खासदार राजन विचारे यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली.

दुसऱ्या टप्प्यातील रेल्वे मार्गीका व कळवा एलिवेटेड स्टेशन काम सुरू करण्यासाठी १०८० झोपड्यांचे पुनर्वसन एमएमआरडीए व आर अँड आर मार्फत झाल्यानंतर सुरू करण्यात येईल असे सांगण्यात आले. परंतु खासदार विचारे यांनी काम सुरू होईपर्यंत या मार्गिकेवर १ लाईनवरून माल डब्यांची गाडी येत असते त्या मार्गिकेचे मजबुती करून करून सकाळी व संध्याकाळी कल्याण - डोंबिवली वरून येणाऱ्या गाड्या थेट नवी मुंबईला सोडण्याची मागणी रेल्वे प्रशासनाकडे केली.



# दिवा-वसई रेल्वेच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

**ठाणे:** दिवा- वसई रेल्वे मार्गिकेवर एका बिबट्या नराचा मृतदेह सापडल्याची घटना शुक्रवारी समोर आली. त्या बिबट्याचा रेल्वेच्या धडकेत मृत्यू पहाटे ३ ते ४ वाजण्याच्या सुमारास झाला असून या घटनेत त्या बिबट्याचे दोन्ही मागचे पाय, डावा पुढचा पाय पूर्णपणे कापले गेले आहेत. तसेच मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाला आहे. तो नर बिबट्या ३ ते ४ वर्षांचा असून त्याची ओळख ही पुढे आली आहे. तर, शवविच्छेदनानंतर त्याचे शव जाळून नष्ट करण्यात आल्याची माहिती संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अधिकाऱ्यांकडून देण्यात आली .

दिवा वसई येथील कामण भागात शुक्रवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास रेल्वेने बिबट्याला धडक दिली. अशी माहिती रेल्वे कर्मचाऱ्याने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर वन विभागाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी बिबट्याचा मृतदेह असलेल्या ठिकाणी पंचनामा केला. बिबट्याचा अपघात झाल्याने त्याचे दोन्ही मागचे पाय, डावा पुढचा पाय पूर्णपणे कापले गेल्याचे आढळून आले. तसेच मोठ्याप्रमाणात रक्तस्त्रावही झाला होता.

बिबट्याचा मृतदेह संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पशुवैद्यकीय दवाखान्यात नेण्यात आले. हा नर बिबट्या असून त्याचे वय सुमारे तीन ते चार वर्ष आहे. हा बिबट्या सी-४५ असल्याची ओळख पटली आहे.

## राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागाची महसुलीत मोठी वसुली

**ठाणे :** गतवर्षीच्या तुलनेत यंदा राज्य उत्पादन शुल्कच्या ठाणे विभागाने महसुली उत्पन्नात मोठी म्हणजे सुमारे ३१ कोटींची अतिरिक्त वसुली केली. त्यामुळे एकूण महसुली उत्पन्नाचा आकडा ३२५ कोटींवर पोहोचला आहे. ठाणे विभागामार्फत राज्याच्या तिजोरीत ३२५ कोटींची महसुली रूपात उत्पन्न म्हणून भर पडली आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर आणि आतापर्यंतची ही ठाणे विभागाची विक्रमी वसुली असल्याचे म्हटले जात आहे.

गेल्या आर्थिक वर्षात (२०२१-२२) करोनाचा प्रादुर्भाव होता. मात्र याही परिस्थितीत राज्य उत्पादन शुल्कच्या ठाणे विभागाने दिलेल्या उद्दिष्ट पेक्षा अधिक महसूल जमा केला होता. ठाणे विभागाने २९५.४७ कोटी रुपयांची तेंव्हा महसूल वसुल केला होता. याचदरम्यान कोरोनात घातलेले निर्बंध कमी करण्यात आले. त्यामुळे राज्य सरकारचा महसुल कसा वाढेल या दृष्टीने उत्पादन शुल्क विभागाने चांगली कंबर कसली होती. २०२२-२३ या आर्थिक वर्षात राज्याला सुमारे २१ हजार ५०० कोटींचा महसूल करण्यात यश आले. याकरिता विभागाच्या प्रत्येक कार्यालयाने जास्तीत जास्त भरीव कामगिरी करण्यावर विशेष भर दिला. यामध्ये ठाणे विभागाने त्या आर्थिक वर्षात सुमारे ३२५.५३ कोटी रुपये जमा केले. हे महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी दारूची दुकाने, बार अँड रेस्टॉरंट यांचा परवाना नूतनीकरण, बाहेरून आपल्या राज्यात येणाऱ्या मद्यावरील शुल्क (आयात शुल्क), परवाना दुसऱ्या जागी स्थलांतर करणे (विशेष अधिकार शुल्क ) अशा विविध मार्गांवर जोर टाकल्याने या वर्षात ३० कोटी ६० लाखांचा अधिक महसूल वाढविण्यात यश आले आहे.

# दिव्यात सेना भाजपचा वाद पोलीस ठाण्यात

## शिवसेना व भाजप पदाधिकारी यांचे एकमेकां विरोधात गुन्हे दाखल

## भाजपचे रोहिदास मुंडेंवर गुन्हा, तर भाजपच्या आंदोलनाची बदनामी केल्याप्रकरणी आदेश भगत यांच्यावरही गुन्हा दाखल

***दिवा:- शिवसेना उपशहर प्रमुख आदेश भगत यांनी बदनामी झाल्याचा आरोप करत भाजपचे रोहिदास मुंडे यांच्या विरोधात तक्रार दाखल केल्यानंतर मुंडे यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.तर दुसरीकडे दिव्यात पालिकेचे हॉस्पिटल व्हावे यासाठी शेकडो महिलांनी भाजपच्या नेतृत्वाखाली केलेल्या आंदोलनची खिल्ली उडवून बदनामी केल्या प्रकरणी शिवसेना पदाधिकारी आदेश भगत यांच्यावर मुंब्रा पोलिसांत अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.***

बंटी और बबली ही काल्पनिक ठग, ब्लॅकमेलर, पैशांचा गंडा घालणारी, अधिकारी, व्यावसायिक लोकांना धमकी देणारी जोडी विषयी व्हायरल झालेला मॅसेज हा आपल्यालाच उद्देशून लिहला आहे असा समज करून शिवसेनेची बदनामी रोहिदास मुंडे यांनी केल्याचा आरोप करत शिवसेना पदाधिकारी आदेश भगत यांनी मुंब्रा पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून मुंब्रा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.आदेश भगत यांनी व्हायरल केलेल्या सदर मजकुरात भाजपने केलेल्या आंदोलनाचा कोणताही थेट उल्लेख करण्यात आला नव्हता. तसेच कुठल्याही पक्षाचा व पदाधिकाऱ्यांच्या नावाचा उल्लेख केला नव्हता. असे असताना व्हायरल झालेला मॅसेज आम्हालाच उद्देशून लिहण्यात आल्याचा गैरसमज करून दिवा भाजप अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी शिवसेना दिवा शहर व पदाधिकारी यांच्याविरोधात पोलिसात खोट्या तक्रारी करण्याचं काम व खोटी माहिती पत्रकारांना देऊन सोशल मीडियावर त्यांची बदनामी करण्याचे काम केलं केल्याचा आरोप भगत यांनी केला आहे.

दोन्ही बाजूने आरोप प्रत्यारोप झालेले असताना फक्त भाजप दिवा मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांच्यावर शिवसेनेचे आदेश भगत यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केल्या नंतर भाजपचे ज्येष्ठ आमदार संजय केळकर यांनी मुंब्रा पोलिसांना जाब विचारला होता.त्यानंतर मुंब्रा पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत भाजप्या दिवा महिला अध्यक्षा ज्योती पाटील व मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांच्या तक्रारीवरून शिवसेनेचे आदेश भगत यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

१० एप्रिल ला दिव्यातील शेकडो महिलांनी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या नेतृत्वाखाली ज्योती पाटील यांच्या पुढाकाराने दिव्यात पालिकेचे रुग्णालय व्हावे यासाठी धरणे आंदोलन केले होते याबाबतच्या बातम्या ११ एप्रिलला प्रसिद्ध झाल्यानंतर त्या दिवा न्यूज या व्हाट्सअप ग्रुप वर भाजपकडून टाकण्यात आल्या. यानंतर लगेचच त्या ग्रुपवर आदेश भगत यांनी भाजपच्या महिलांच्या आंदोलनाची खिल्ली उडवणारा मेसेज दिवा न्यूज या व्हाट्स अप ग्रुप वर टाकला. दिवा मंडळ हे पद ठाणे शहर अंतर्गत येथे मात्र बंटी आणि बबली हे स्वतःला शहराध्यक्ष व महिला अध्यक्ष पद लावतात, कालच्या आंदोलनाकडे नागरिकांनी पाठ फिरवली अशा आशयाचा उल्लेख करून भाजपची व आंदोलनाची बदनामी करण्याच्या उद्देशाने मेसेज फिरवला असे ज्योती पाटील व रोहिदास मुंडे यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात म्हटले आहे.

भाजपच्या माध्यमातून शेकडो महिलांनी १० तारखेला हॉस्पिटलच्या मागणीसाठी आंदोलन केल्यानंतर ११ तारखेला शिवसेनेचे आदेश भगत यांनी महिलांच्या या जनहिताच्या आंदोलनाची खिल्ली उडवली, जिथे आमच्या बातम्या पडल्या तिथेच त्यांनी कालच्या आंदोलनाकडे पाठ म्हटले, दिव्यात १० तारखेला भाजपचेच आंदोलन झाले होते, परिणामी आमची बदनामी करण्याच्या उद्देशाने आदेश भगत यांनी हा मेसेज फिरवण्यात आला होता असे मत गुन्हा दाखल केल्यानंतर रोहिदास मुंडे यांनी व्यक्त केले.

## जलवाहतुकीच्या कामास गती द्या!

### खासदार विचारे यांची महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे मागणी

**ठाणे:** ठाणे, नवी मुंबई व मीरा-भाईंदर या तीन महानगरपालिका क्षेत्रात जोडणाऱ्या जलमार्गासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मार्फत नव्याने सुरू होणाऱ्या प्रवाशी जेट्टीच्या कामांची स्थिती व पर्यटकांसाठी तयार झालेल्या जेट्टी व चौपाटीच्या कामांचा आढावा घेत, ते त्या कामास गती द्या अशी मागणी ठाण्याचे खासदार राजन विचारे यांनी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाला केले.

नुकतीच म्हणजे बुधवारी मुंबई येथील महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड यांच्या दालनात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ही मागणी केली आहे. या बैठकीला महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी, मुख्य अभियंता राम गोसावी, मुख्य बंदर अधिकारी कॅप्टन खरा, पर्यावरण अधिकारी ज्योती पाटील, कार्यकारी अभियंता अजित मोहिते, उपअभियंता प्रशांत सानप तसेच मीरा-भाईंदर महापालिकेच्या माजी नगरसेविका शर्मिला बगाजी, बर्नार्ड डिमेलो, मच्छीमार संस्थेचे माजी चेअरमन मालकम भंडारी उपस्थित होते.

दरम्यान राष्ट्रीय जलमार्ग क्रमांक ५३ मधील पहिल्या टप्प्यातील कोलशेत, काल्हेर, मीरा भाईंदर- जैसल पार्क तसेच डोंबिवली या जेट्टीची कामे सुरू करण्यास विलंब का होत आहे असे विचारले असता. मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी यांनी या जेट्टीची कामे सुरू करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. परंतु प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा निविदा प्रक्रिया सुरू करणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच राष्ट्रीय जलमार्ग क्रमांक ५३ अंतर्गत टप्पा दोन मधील ऐरोली येथे जैवविविधता केंद्र येथे असणाऱ्या जेट्टी विकसित करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती याची विचारणा केली असता या कामासाठी ३२.८५ कोटी एवढे रकमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्याचबरोबर ठाणे व ऐरोली या खाडी दरम्यान जलवाहतुकीला अडथला ठरणारा रॉक ड्रेजिंग करण्यासाठी नुकताच ४४० कोटीची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

## मते आपल्याकडेच वळावीत हा प्रयत्न अंगाशी आला-जितेंद्र आव्हाड

**ठाणे:** संतांचा आणि धर्माचा वापर राजकारणात करावा आणि त्यासाठी बळी द्यावेत. आणि नंतर मते आपल्याकडेच वळावीत हा प्रयत्न शिंदे-फडणवीस सरकारच्या अंगाशी आला आहे. अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी करत यापुढे देखिल येईल. सर्वसामान्य निष्पाप जीवांचा बळी घेऊन राजकारणातील मते वाढविण्याचा हा कार्यक्रम अत्यंत धोक्याचा आहे हे या प्रकरणातून सिद्ध झाले. असेही ते म्हणाले, तर आता जबाबदारी कोणाची ? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला.

डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात आला. या महान संतांना महाराष्ट्र भूषण दिल्याबद्दल त्यांच्या भाविकांना प्रचंड आनंद झाला होता. त्या आनंदाचा राजकीय फायदा उठवण्याचे सरकारने ठरवले. अशी टीका आव्हाडांनी केले. पुढे बोलताना,आव्हाड यांनी खरतरं 'भारतरत्न' सारखा पुरस्कार हा राष्ट्रपतींच्या हस्ते एका हॉलमध्ये प्रदान केला जातो. पण, संपूर्ण जगभर त्याचे प्रक्षेपण केले जाते. हा कार्यक्रम देखिल त्यापद्धतीने करता आला असता. ह्या कार्यक्रमाची वेळ बघितली तर कुठेही बुद्धी वापरुन काम केलेले दिसत नाही. फक्त राजकीय लाभ उठविण्यासाठी म्हणून गर्दी जमा करायची आणि आम्ही तुमच्या संतांना पुरस्कार देत आहोत असं दाखवायचं हे अत्यंत चुकीचे धोरण यामध्ये दिसत होते.

